Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 600 – 606

DOI: 10.5281/zenodo.10258939

Original Research Article

# महात्मा गांधीजीची सत्याग्रहाची भूमिका आणि तंत्र

प्रा. डॉ. देशमुख गंगाधर बालाजीराव

इतिहास विभाग, वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर ता. देगलूर जि. नांदेड ४३१७१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: deshmukhgangadhar1989@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधी यांच्या विचारातून तयार झालेला अभिनव प्रयोग म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह या तंत्राची उपयुक्तता आणि फायदे समजुन त्यानुसार अनुकरण करणे ही काळाची गरज आहे .महात्मा गांधी यांनी अन्यायी ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध सत्याग्रहाच्या माध्यमातून आपले हक्क, अधिकार, आणि राजकीय स्वतंत्र मिळवण्यासाठी केलेला प्रयत्न हा सामान्य जनमानसात रुजत गेला. सत्याग्रह या तंत्रामध्ये गांधीजींनी अहिंसात्मक पद्धतीने विना शस्त्र वापरता युद्ध जिंकण्याची कला किंवा मार्ग सत्याग्रहाच्या अभिनव तंत्रातून कसे साध्य करता येते. या बाबी ब्रिटिशाविरुद्ध विविध चळवळीत सत्याग्रहाचा केलेला वापरावरून लक्षात येते. सत्याग्रहाद्वारे अन्याय अत्याचार करणाऱ्या व्यक्ती, व्यक्ती समूह यांच्यात हृदय परिवर्तन घडवून आणणे आणि इच्छित ध्येय साध्य करणे म्हणजे सत्याग्रह होय. अन्याय अत्याचार करणाऱ्या पुढे स्वतःचे मत निर्भीडपणे आणि शांततेच्या मार्गाने अहिंसक पद्धतीने मांडत राहणे आणि ते मिळवण्यासाठी ठाम राहणे. अशा तंत्रालाच सत्याग्रह म्हटले जाऊ लागले. असाध्य बाबी साध्य करण्याचे तंत्र सत्याग्रह ही बाब महात्मा गांधी यांनी आपल्या राजकीय जीवनात अमलात आणली. सत्याग्रहातून सत्य, अहिंसात्मक प्रेमळ भाव, अन्याय, दडपशाही, शोषण यांच्यात आशावादी किरण जागृत करून वाईट विचार आपोआप नष्ट होत जातील ही किमया साधणारे सत्याग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. कारण सत्याग्रहातून अत्याचार करणाऱ्या पुढे न झुकता त्यास सत्य, अहिंसा या बाबीची जाणीव करून देऊन त्यांनी केलेल्या चुका मान्य करण्यास आणि त्यातून मार्ग काढण्याचा सल्ला देणे. ही बाब सत्याग्रहातून प्रकर्षाने दिसून येते. महात्मा गांधी यांनी तत्कालीन ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध सत्याग्रहाचा अभिनव प्रयोग करताना सर्वप्रथम स्वतःची आत्मबल, निर्भीडपणा शेवटपर्यंत लढण्याची क्षमता यातून सत्याग्रह यशस्वी

होऊ शकतो. ही भावना भारतीय लोकांमध्ये जागृत केली. त्यामुळे सत्याग्रहाचे साधन कोट्यवधी भारतीय जनतेला वापरण्याची प्रेरणा मिळाली. सत्याग्रहाचा हा अभिनव प्रयोग सर्वसामान्य लोकांना गांधीजीच्या संकल्पनेतून मिळाले.

**संशोधनाचे उद्दीष्टे**

१. सत्याग्रह या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. सत्याग्रह या व्यापक तंत्राचा उद्देश व उपयोग समजून घेणे.

३. सत्याग्रहाची गांधी प्रेरणीत तत्वे अभ्यासणे.

**गृहीतकृत्ये**

१. सत्याग्रह ही बहुआयामी संकल्पना आहे.

२. सत्याग्रह ही बाब जनमानसात दृढ झालेले तंत्र होय.

३. स्वतःचे हक्क अधिकार मिळवण्यासाठी उपयुक्त असे सद्यस्थितीतील तंत्र सत्याग्रह आहे.

**सत्याग्रहाचे महत्त्व**

सत्याचा आग्रह धरून आपले हक्क अधिकार मिळवणे म्हणजे सत्याग्रह होय. ही बाब सत्याग्रहाच्या अभिनव प्रयोगातून दिसून येते. सत्याग्रह म्हणजे अन्याय, दडपशाही आणि शोषित लोकांनी केलेल्या आपल्या हक्क अधिकारासाठी आत्मीय शक्तीचा स्वबळावर केलेला वापर होय. सत्याग्रहामध्ये प्रामुख्याने अहिंसा, सत्य या बाबीला महत्वपूर्ण स्थान दिले जाते. त्यामुळेच सत्याग्रह हे यशस्वी होण्यास मदत होते. सत्याग्रह हे मानवाचे नैतिक अस्त्र असून त्याचा वापर योग्य वेळी आत्मबल या आधारावर स्वतःचे विचार मांडताना आत्मविश्वास जागृत होतो .त्यातून सत्याग्रहावर श्रद्धा, विश्वास निर्माण होते असे मत महात्मा गांधी यांनी मांडले आहे .गांधीजींच्या मते जगातील कोणतीही लढाई शस्त्रविना सुद्ध  जिंकू शकतो फक्त त्यासाठी सत्याग्रह या अभिनव तंत्राचा वापर कसा करावा त्यातील महत्त्वपूर्ण बाबी लक्षात घेऊन सत्याग्रहाला योग्य दिशा मिळाली तर तो पूर्णपणे यशस्वी होतो .महात्मा गांधी पूर्वी सुद्धा सॉक्रेटिस, येशू ख्रिस्त आदी महापुरुषांनी सत्याग्रह या तंत्राचा वापर केलेला होता .त्यांना सुद्धा तत्कालीन स्थितीमध्ये योग्य ते फळ त्याचबरोबर कोट्यावधी जनमानसात सत्याग्रह या बाबीचा प्रसार प्रचार करण्यास संधी मिळालेली होती. सत्याग्रह मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो हक्क, अधिकार पवित्र कार्यासाठी करणे आवश्यक आहे .सत्याग्रहाचा उपयोग स्वसार्थासाठी त्याचबरोबर विश्वासघातकी लोकांना पाठिंबा देण्यासाठी केल्यास सत्याग्रह त्यास म्हणता येणार नाही असे मत महात्मा गांधी यांनी यंग इंडिया नावाच्या वृत्तपत्रातून इसवी सन १९२२ मध्ये सत्याग्रहाबद्दल मत मांडले आहे. सत्याग्रह यामध्ये सत्याचा अंतिम विजय होण्याच्या टप्प्यापर्यंत जर मृत्यु पत्करण्याची वेळ आली तरी तो सत्याचा विजय समजला जावा. म्हणजेच निशस्त्र प्रतिकार आणि त्यातून सामाजिक बदल हे वीर पुरुषाचे अस्त्र होय आणि तीच बाब विरोधकाच्या मनात प्रेम आदर निर्माण करून आपण करत असलेल्या अन्याय अत्याचारी वर्तन योग्य नाही ही भावना निर्माण होते व तो अन्यायी मार्गातून पूर्णपणे किंवा काही अंशी तरी बदलाच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रारंभ करतो. जगाचा

इतिहासात सत्याग्रहा ची पार्श्वभूमी पाहत असताना महात्मा गांधीजींच्या विचारावर आधारित भारतातील पहिले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे, त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला यांनी वर्णभेदाविरुद्ध न्याय मिळण्यासाठी केलेला प्रयत्न, अमेरिकेत मार्टिन ल्युथर किंग यांनी अहिंसात्मक दिलेला लढा दिला. या उदाहरणावरून महात्मा गांधीजींच्या या अभिनव सत्याग्रह तंत्रामुळे जागतिक समस्या त्याचबरोबर सकारात्मक अहिंसात्मक गांधी मार्गाच जगाला अशांततेकडून शांततेकडे नेऊ शकतो याची जाणीव झाली आहे. त्यामुळेच राष्ट्र राष्ट्रांमध्ये सलोखा, शांती, विश्वास व विकास घडून आणण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग सर्वात जवळचा होय.

**सत्याग्रहाचा अर्थ**

महात्मा गांधी यांच्या विचारानुसार सत्य आणि अहिंसा ही दोन मूल्य सत्यरुपी परमेश्वराला पूजनी आहेत .त्यातून अंतिम सत्याचा विजय करण्यास तो पूर्णपणे एकरूप होतो. बाकी सर्व बाबी गौण असून सत्याच्या मार्गावर एकटाच अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी आत्मबल आपल्या मनात असणारा भाव आणि आत्म्याची शुद्धता यावर ईश्वर सत्याची साथ देतो. सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी सत्य हे साध्य असून अहिंसा हे प्राप्त करण्याचे साधन आहे. अहिंसा वाचून सत्याचा विजय होणे अशक्य आहे. म्हणजेच सत्य आणि अहिंसा या दोन बाबी सत्याग्रहाचे मूलभूत अंग होय. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा यावर आधारित सत्याग्रहाचे अभिनव तंत्र उपयोगात आणले यातून मानवतेचे कल्याण, शाश्वत सुख, शांततामय जीवन त्याचबरोबर दुसऱ्याविषयी आपुलकी प्रेम या बाबी प्रकर्षाने जाणवतात .सत्याग्रहामुळे आपण ज्या व्यक्ती, व्यक्ती समूह याविरुद्ध सत्याग्रह करत आहोत त्याच्या मन परिवर्तनातून तो शत्रू न राहता मित्र बनतो.

**सत्याग्रहाची वैशिष्ट्ये**

१. सत्याग्रहाची कल्पना नकारात्मक नसून सकारात्मक इच्छित फळ देणारे तंत्र होय.
२. सत्याग्रह दुर्बलाचे तत्त्व नसुन नैतिक आत्मबलाचा आधार होय.
३. अहिंसा मार्गाचा अवलंब करून सत्य प्राप्त करण्याचे एकमेव मार्ग आहे.
४. सत्याग्रह आत्मबळावर लढण्याचे एकमेव तंत्र होय.

**सत्याग्रहाची उद्दिष्टे**

१. स्वतःचे हक्क अधिकार मिळवण्यासाठी सत्याग्रहा चा वापर केला जातो
२. सत्याग्रह हे अन्याय अत्याचार यावर निशब्द प्रतिकार करण्याचे महत्वपूर्ण साधन होय.
३. सत्याग्रहातून शोषित पीडित अन्यायग्रस्त लोकांचे प्रश्न मांडताना स्वअस्तित्व, आत्मबल किती उपयोगी पडते याची जाणीव होते.
४. कोणतीही लढाई शस्त्रविना जिंकण्याचे एकमेव माध्यम म्हणजे सत्याग्रह होय.

**महात्मा गांधी यांच्या मते सत्याग्रह मार्गाचा हेतू व उद्देश**

१. सत्याग्रह करणारी व्यक्ती सत्याचा आग्रह करून इच्छित फळ मिळवण्यासाठी शेवटपर्यंत ठाम असणे आवश्यक आहे

२. सत्याग्रह करताना ईश्वरावर श्रद्धा असावी विरोधकाकडून कोणताही त्रास होत असेल तेव्हा त्रास करण्याची क्षमता अंगी असावी

३. सत्याग्रह हे स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा प्रसिद्धीसाठी केले जाऊ नये

४. सत्याग्रहातून एखाद्या विशिष्ट व्यक्ती, व्यक्ती समूह, यावर झालेल्या अन्यायाच्या प्रतिकार करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम सत्याग्रह होय ही दृढ संकल्प असावे.

५. सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीचे आरोग्य उत्तम असावे विरोधकाबद्दल प्रेम आदराची भावना ठेवणारे गुण सत्याग्रहात असावे

६. सत्याग्रही मध्ये सत्याग्रह करताना कोणत्याही बाबीची भीती नसावी.

**सत्याग्रहाची तंत्रे**

**(१) असहकार**

महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने असहकार या बाबीचा वापर करून ब्रिटिश शासन व्यवस्थेला त्यांच्या कार्यप्रणाली त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, हक्क, अधिकार या बाबी भारतीयांना मिळवून देण्यासाठी असहकार या सत्याग्रहाच्या अभिनव तंत्राचा वापर करून ब्रिटिशांच्या अन्याय अत्याचारी व शोषण करणाऱ्या राज्य प्रणालीचा विरोध म्हणून असहकार मार्गावर आपले आंदोलन चालू सातत्यपूर्ण चालू ठेवण्याची भूमिका बजावली त्यामध्ये प्रामुख्याने इ.स १९२० मध्ये नागपूर येथे काँग्रेसच्या अधिवेशनात असहकाराचा ठराव मांडला गेला यामध्ये असहकार तंत्रात भारतीय लोकांनी ब्रिटिश शासन व्यवस्थेला मदत न करता त्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करावा यासाठी आपल्या मुलांना सरकारी शाळेतून शिक्षण घेऊ न घेणे, विदेशी मालावर बहिष्कार टाकणे, सरकारी नोकऱ्या चा राजीनामा देणे, कायदेमंडळावर बहिष्कार टाकणे, ब्रिटिश शासनाने दिलेल्या पदव्या, किताब परत करून टाकणे, अशा बाबीतून महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांना भारतात राज्य करण्यासाठी भारतीयांची मदत घेणे आवश्यक आहे आणि भारतीयांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर योग्य ते उपाययोजना करून भारतीयांचे हक्क अधिकार आणि स्वातंत्र्य देऊन भारतातून निघून जाणे हा एकच पर्याय त्यांच्यापुढे ठेवला ही बाब असकार या तंत्रातून दिसून येते.

**(२) सविनय कायदेभंगाची चळवळ**

इसवी सन १९३०-३१ मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ महात्मा गांधी यांनी ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध उभारली .त्यामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करून अन्यायी कायदे ,त्याचबरोबर त्या कायद्यानुसार

राज्य कारभार करण्याची भूमिका ही भारतीय लोकांसाठी पिळवणुकीचे माध्यम ठरले गेले होते. कायदेभंगाच्या चळवळीमुळे अहिंसात्मक माध्यमातून ब्रिटिशांच्या अन्यायी तकायद्यांचा विरोध करण्यासाठी म्हणून महात्मा गांधी यांनी भारतभर वेगवेगळया ठिकाणी सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा मार्ग स्वीकारला. त्यामध्ये १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह' दांडी, या ठिकाणी केला. असे सत्याग्रह भारताच्या विविध भागात विविध सत्याग्रहातून महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र लढ्यासाठी भारतीयांच्या मनावर अहिंसा या तत्त्वावर व सत्याचा विजय प्राप्त करण्यासाठी ब्रिटिश कायदे मोडून स्वतःचे अस्तित्व स्वतःचे अधिकार अबाधित ठेवण्याचे एक माध्यम म्हणजे सविनय कायदेभंग या बाबीतून समाजाला एक वेगळी ओळख निर्माण करून दिली. आणि यातून ब्रिटिश शासन व्यवस्थेला भारतीयांच्या विरुद्ध होत असलेल्या अन्यायी वर्तनाला योग्य ते सडेतोड उत्तर देण्याची भूमिका बजावली.

**(३) बहिष्कार**

बहिष्कार हे सत्याग्रहाचे प्रमुख महत्त्वपूर्ण साधन होय. महात्मा गांधी यांनी बहिष्कारच्या माध्यमातून ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही क्षेत्रात या बाबीचा अवलंब केला. भारतीय जनतेने ब्रिटिश शासन व्यवस्थेला भारतातून बाहेर काढण्यासाठी त्यांच्या उद्योग, व्यवसाय, व्यापार आणि दैनंदिन वस्तू यावर बहिष्कार टाकला तर त्यातून भारतीयांची ब्रिटिश शासन व्यवस्थेवर असणारी पकड त्याचबरोबर भारतीयांच्या मागण्या ,हक्क, अधिकार समजून घेण्याची मानसिकता निर्माण व्हावी, म्हणून गांधीजींनी सरकारी नोकऱ्या त्याचबरोबर सरकारी शाळा न्यायालय इत्यादी बाबीवर बहिष्कार टाकून त्या ठिकाणी न जाता स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवणे या अहिंसात्मक मार्गामुळे ब्रिटिश शासन व्यवस्थेवर बहिष्कार हे तंत्र खूप उपयोगी पडले. बहिष्कार आणि एखाद्या व्यक्तीला न बोलता आपले कार्य किंवा आपले उद्दिष्ट साध्य करू शकतो यातून आत्मविश्वास, स्वालंबन आणि स्वअस्तित्वाची जाणीव होण्यास मदत होते .त्यामुळे महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांना शह देण्यासाठी बहिष्कार या तंत्राचा वापर केलेला दिसून येतो आणि या तंत्रामुळेच ब्रिटिश शासन व्यवस्थेला राजकीय, सामाजिक या बाबीत भारतीयांचा सहभाग घेणे भाग पडले हे बहिष्काराचे फलित होय.

**(४) उपोषण**

आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी म्हणून वापरण्यात येणारे महत्त्वपूर्ण साधन म्हणजे उपोषण होय. उपोषण तंत्र अत्यंत उपयोगी असून योग्य वेळीच वापरायचे असते. महात्मा गांधी यांनी ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी उपोषणाचे शस्त्र अनेक वेळा वापरलेले आहे. महात्मा गांधी यांच्या मते उपोषण हे शस्त्र याचा दुरुपयोग होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. याबद्दल विचार मांडताना महात्मा गांधी असे म्हणतात की, उपोषण हे आत्मक्लेष किंवा पुढील व्यक्तींना आपल्या भावना विचार हक्क याची जाणीव करून देण्यासाठी निशब्द अहिंसात्मक मार्गाने टाकलेले पाऊल होय.महात्मा गांधी यांनी इ.स १९३३ मध्ये हरिजनांची सेवा अधिक चांगल्या प्रकारे करता यावी यासाठी २१ दिवसांचे उपोषण केले. त्याचबरोबर इ.स.१९४७ मध्ये हिंदू मुस्लिम ऐक्या ऐक्य प्रस्थापित

व्हावे यासाठी म्हणून सुद्धा उपोषण केले यावरून महात्मा गांधी यांच्या उपोषण या अभिनव तंत्रात आत्मविश्वास जागृत करण्याची एक पूर्ण साधन होय महत्वपूर्ण साधन होय.

**(५) धरणे**

धरणे या तंत्राचा अवलंब महात्मा गांधी यांनी ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध करताना ब्रिटिश शासन व्यवस्थेची चूक जनतेच्या समोर नजरेस आणून देण्याचे एक माध्यम ठरविले होते .अशा प्रकारे गांधीजींनी सत्याग्रहाचे विविध माध्यम वापरताना धरणे हा सत्याग्रहाचा अत्यंत काळजीपूर्वक व जबाबदाऱ्यांनी स्वीकारला जाणारा मार्ग म्हणून उपयोगात आणला होता यामुळे भविष्यात भारतीय जनता आपल्या हक्क अधिकार त्याचबरोबर अन्याय ,अत्याचारी बाबी विरुद्ध दबाव, धमकी, हिंसा किंवा घेराव या मार्गाचा अवलंब न करता एका ठिकाणी बसून सत्याग्रहाच्या अभिनव प्रयोग वापरून त्यातून योग्य ते बदल घडून आणण्याची क्षमता धरणे या संकल्पनेतून पुढे येण्यास मदत झाली. महात्मा गांधी यांच्या अशा हिंसे ऐवजी शस्त्राशिवाय लढाईमध्ये धरणे हे महत्त्वपूर्ण साधन ठरले गेले.

**(६) संप (हरताळ)**

महात्मा गांधी यांनी कामगार कष्टकरी शेतकरी यांच्या प्रश्नावर उपाय म्हणून संप, हरताळ हे माध्यम तत्कालीन स्थितीत निवडले होते .यातून लोकांच्या व सरकारच्या निदर्शनास एखादी गोष्ट आणून देण्यासाठी संप हे घडून आणला जाऊ लागला .यातून व्यापार ,व्यवसाय ,उद्योगधंदे हे पूर्णपणे बंद ठेवून त्याचा परिणाम मानवी जीवनावर त्याचबरोबर राजकीय ,सामाजिक बाबीवर कशा पद्धतीने होतो .याची जाणीव करून देण्याची माध्यम म्हणजे संप किंवा हरताळ होय .यातून पुढील व्यक्तीचे हृदय परिवर्तन घडवून आणून मागणी मागणाऱ्या व्यक्तींचे प्रश्न समजून घेऊन त्यावर योग्य ते उपाय शोधण्याचा अवलंब करणे हे तंत्र महात्मा गांधी यांनी उपयोगात आणले होते. त्यामध्ये अहमदाबाद येथील गिरणी कामगार यांचा संप घडून आणला यातून कामगारांना वेतन वाढ मिळण्यास मदत झाली .अशा बाबी महात्मा गांधी यांच्या विचारातून भारतात रूढ होण्यास प्रारंभ झाला. सत्याग्रहाचे वेगवेगळे तंत्र त्यामधील हरताळ संप हे आजच्या स्थितीमध्ये सुद्धा त्याचा अवलंब केला जातो आणि त्यातून आपले हक्क, अधिकार प्राप्त करून घेण्याचा भारतीय जनता उपयोग करते हे सर्व महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याचे फलित आहे.

**सारांश**

१९व्या शतकात महात्मा गांधी यांनी सत्याग्रह या अभिनव तंत्राच्या माध्यमातून ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध लढा देण्यासाठी निवडलेला मार्ग हा अहिंसा, सत्य यावर आधारित मार्ग असून त्यामध्ये प्रामुख्याने सत्य आणि सत्याचा विजय हे अंतिम ध्येय साध्य करून घेण्यासाठी वेळप्रसंगी प्राणाची आहुती देण्याची भूमिका दृढ ठेवण्याचा संकल्प .त्याचबरोबर आत्मकेंद्री आत्मबलिदान, हृदय परिवर्तन, प्रेम, मित्रत्व, सद्भावना, आपुलकी, अधिकार, हक्क, अशा बाबी सत्याग्रह या तंत्रामध्ये समाविष्ट झालेल्या दिसून येतात. महात्मा गांधी यांच्या सत्याग्रह आणि सत्याग्रहाची भूमिका तंत्राचा वापर करताना सत्याग्रहाचा अतिरेक होऊ नये .यासाठी सत्याग्रहाचे मूलभूत अंग, उद्दिष्टे, विचार, त्यातून

सत्याग्रहात सत्याग्रहीची भूमिका पार पडण्याचे जबाबदारी स्वार्थी, व्यक्तीकेंद्री नसून समाजकेंद्रीत असावी. यातून असाध्य ते साध्य करता येते. ही बाब आपल्या सत्याग्रहाच्या अभिनव तंत्रातून जगाला दिलेली देणं आहे.

**संदर्भ सूची**


१. अरुण सारथी - शोध महात्मा गांधीचा, (खंड.१), अस्मिता प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे,१९९८
२. भारदे बाळासाहेब - सत्याग्रह -विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधीभवन कोथरूड, पुणे. चौथी आवृत्ती. १९९४.
३. धर्माधिकारी भाऊ, (संपा) - गांधी विचारदर्शन, गांधी स्मारक निधी, पुणे
४. शिंदे. ज.रा. - भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९
५. मिश्रा. एम. के., दायीच कमल- गांधी दर्शन, अर्जुन पब्लिकेशन हाऊस, नवी दिल्ली,प्रथम आवृत्ती. २०११
६. समाज प्रबोधन पत्रिका - जुलै - सप्टेंबर २०१३
७. वासंती सोर - एकविसाव्या शतकात गांधी, परधाम प्रकाशन, पवनार, जि. वर्धा, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर २०१३
८. रॉय किणीकर (संपादक), सहाय्यक अनिल किणीकर - गांधी नावाचे महात्मा, डायमंड पब्लिकेशन, शनिवार पेठ, पुणे, प्रथम. आवृत्ती, २०१२